# प्रस्तावना

**विषय :- मनपा क्षेत्रातील GPS BASED प्रणालीव्दारे वृक्षांची गणना करणे कामास वाढीव कामाच्या कार्यादेश कामी मुदतवाढ मिळणे कामी वृक्षप्राधिकरणाची मान्यता मिळणे बाबत.**

**मे.सादर**

मनपाच्या हद्दीतील वृक्षांची गणना (Gps Based) करणेचे काम कामाच्या वाजवी व योग्य दरानुसार मागविण्यांत आलेल्या ई निविदानुसार मंजुर ई निविदानुसार सदर कामाचे कार्यादेश श्री स्वामी समर्थ इंटरप्रायझेस, चरई,ठाणे यांचे इकडील जा.क्र./भिनिशमनपा/उद्यान/४२५,दि.२१/०६/२०२२ ने दिले असता मजकुर ठेकेदार यांनी करारनामा मुदतीत मनपा हद्दीतील २४ वॉर्ड पैकी क्र.५, ८, ९, १०, १५, २२, २४ वृक्षांची गणना Gps based प्रणाली व्दारे या सात वॉर्डातील वृक्षांची गणना पुर्ण केली असुन वॉर्ड क्र. ३६, १३, २३ या चार वॉर्डातील अंशत: कामास एकुण १ लक्ष वृक्षांची गणना पुर्ण केलेली आहे. केलेल्या कामाचे देयेक ठेकेदार यांना सन २०२२-२३ च्या आर्थीक वर्षातील उपलब्ध तरतुद नुसार अदा करणेंत आलेले आहे.

तथापी सदर वृक्षगणनेचे कामी महानगरपालिका पहिल्यांदा करत असल्याने सदर कामा अंतर्गत मनपाच्या वॉर्ड क्र.१३, २३ या वॉर्डातील अंशत: कामासह वॉर्ड क्र. १,२,३,४,६,७,११,१२,१४,१६,१७,१८,१९,२०,२१ या वॉर्डातील वृक्षांची गणना बाकी आहे. त्यामुळे सदर क्षेत्रातील वृक्षांची गणना करणेचे काम पुर्ण करणे आवश्यक आहे. करणेंत येणाऱ्या कामाच्या खर्चास सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात रु. २५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे.

तरी प्रस्तावित कामाच्या मंजुर ई निविदा दरानुसार पुढील काम करणे कामी संबधित ठेकेदार यांसी वाढीव कामाच्या कार्यादेश अंतर्गत १८० दिवस मुदतवाढ दिल्यास प्रस्तृत कामा अंतर्गत शिल्लक राहीलेले काम करता येईल.

तरी प्रस्तावित कामाअंतर्गत शिल्लक राहीलेले काम पुर्ण करणेस सन २०२३-२४ मधील उपलब्ध तरतुद मधुन तसेच अतिरिक्त काम झाल्यास सदर कामाच्या खर्चास पुर्नविलोकन तरतुदीस मान्यता सह सदर कामाच्या प्रस्तावित कामास वाढीव मुदतवाढ मुळ ठेकेदार स्वामी समर्थ इंटरप्रायझेस,ठाणे यांना अटी शर्तीस अधिन राहुन वाढीव कामाचे कार्यादेश देणे

१)देण्यांत येणाऱ्या मुदतवाढ कालावधीमध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण करणे ठेकेदारास बंधनकारक रहील.

२)प्रकल्प कामी मागविणेत आलेल्या ई निविदा मंजुर दरानुसारच वाढीव काम करणे ठेकेदार बंधनकारक राहील. यासह मुळ करारनामा अटी शर्तीस अधिन राहुन तसेच वाढीव कामापोटी मुळ ठेकदाराकडुन सुरक्षा अनामत घेणेसह विषयांकीत कामाच्या मुदतवाढीस मान्यता देणे कामीच्या प्रस्तावनेस मा.वृक्षप्राधिकरण

समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे )झाडांचे जतन संरक्षण अधिनियम १९७५ नियम २००९ अंतर्गत प्रकरण २ कलम ३ (१) अंतर्गत वृक्षप्राधिकरण गठीत नसल्यास महानगरपालिकेसाठी कोणत्याही नावाने संबोधन्यात येणाऱ्या प्रशासकाची नेमणुक करण्यात आली असेतल त्या बाबतीत, तो, आपल्या नेमणुकीच्या काळात वृक्षप्राधिकरण म्हणुन कार्य करेल आणि वृक्षप्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि त्याची सर्व कर्तव्य पार पाडील. सद्या स्थितीत वृक्षप्राधिकरण समिती गठीत नसल्याने विषयांकीत कामी उक्त अधिनियम कलमान्वये मा. प्रशासक सो.यांचे अधिकारात वृक्षप्राधिकरणाची मंजुरी मिळावी ही विनंती.

**वृक्षप्राधिकरण ठराव क्र.** १८१ **दिनांक :-** ८/६/२२

भिवंडी नि.शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील वृक्षगणना करणेचे कामास मुळ ठेकेदारास दिलेल्या कार्यादेशानुसार महानगरपालिका हद्दीतील अंशत: काम पुर्ण झाले असल्याने काम पुर्णत्वास खर्चाच्या तरतुदीसह वाढीव मुदतवाढ मिळणे बाबत सादर केलेल्या प्रस्तावणेस मा.प्रशासक सो.यांचेकडुन मान्यता मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वृक्षांची गणना करणे बाबत मागविण्यात आलेल्या ई निविदानुसार तसेच ई निविदा मंजुर दरानुसार सदर कामाचे कार्यादेश करारनामा अटी शर्तीनुसार स्वामी समर्थ इंटरप्रायझसे,ठाणे यांना देण्यात आलेले आहे. तथापी सदरचे काम अंशत: झाले असल्याने प्रकल्पाचे काम पुर्ण करणेस खर्चाच्या तरतुदीसह व संबधित कामाचे ठेकेदार यांचे सोबत केलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीस अधिन ठेवुन प्रस्तावनेत लागु केलेल्या अटी शर्तीनुसार सदर कामास वाढीव मुदतवाढ देणे कामी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग २) नवि दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ) व १(ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वृक्षप्राधिकरण गठीत नसल्याने महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे )झाडांचे जतन संरक्षण अधिनियम १९७५ नियम २००९ अंतर्गत प्रकरण २ कलम ३ (१) अंतर्गत मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वृक्षांची GPS BASED प्रणालीव्दारे वृक्षांची गणना करणे कामास वाढीव कामाच्या कार्यादेश कामी मुदतवाढ देण्याचे प्रस्तावनेस मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
**अध्यक्ष-वृक्षप्राधिकरण**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**